॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Fax : (02462) 299574
Ext. No 143, 153

**POST GRADUATE SECTION**

website: srtmun.ac.in
E-mail: pg@srtmun.ac.in

जा.क्र.: पीजी/शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनाबाबत/२०२३–२४/ 1213

दि. २१/०५/२०२४

## परिपत्रक

***विषय:*** शासनामार्फत राबविण्यात येणा–या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनांकरिता शै. वर्ष २०२४–२५ च्या प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तीकेत नमुद करावयाच्या सुचनांा बाबत.

***संदर्भ:*** ओम प्रकाश बकोरिया, आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचे पत्र क्रं. सकआ/शिक्षण/भासशि/का–४क/२०२४–२५/७६७४, दि. ०९/०४/२०२४ चे सोबत जोडल्याप्रमाणे पत्र

या परिपत्रकान्वये मा. प्राचार्य सर्व, संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये आपल्या महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिपसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, सोबत काय काय कागदपत्रे लागता, कोणती शिष्यवृती मिळते, शिष्यवृत्तीसाठी अर्ज कोणत्या ऑनलाईन लिंकवर करावा हे लवकर कळत नाही. त्यामुळे खुप विद्यार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित राहतात.

करिता मा. ओम प्रकाश बकोरिया, आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी शासनामार्फत राबविण्यात येणा–या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या आपल्या महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियामाहिती पुस्तिकेत सोबत जोडल्याप्रमाणे सुचना नमुद कराव्यात असे कळविले आहे.

करिता शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या आपल्या महाविद्यालयांच्या प्रवेशप्रक्रिया माहिती पुस्तिकेत सोबत जोडलेल्या शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनांची माहिती नमुद करावी, हि विनंती.

Dayanand College of Commerce
File No. D3
Inward No. 43
Date. 24/05/24
LATUR Dist. Latur

आपला विश्वासू

उपकुलसचिव
पदव्युत्तर विभाग

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. वित्त व लेखाधिकारी, (शिष्यवृत्ती विभाग) प्रस्तुत विद्यापीठ

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दुरध्वनी क्र.२० २६१२७५६९ ईमेल - escholmapping@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/भासाशि/ का-४क /२०२४-२५/ ७१८ \ ०७ दि. ०८/०५/२०२४

प्रति,

मा. कुलगुरू,

राज्यातील सर्व विद्यापीठे.

विषय: शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या/फ्रिशिप योजनांकरीता शै. वर्ष २०२४-२५ च्या प्रवेशप्रक्रिया माहितीपुस्तीकेत नमूद करावयाच्या सूचनांबावत.

महोदय,

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, विद्यावितेने व निर्वाह भत्ता इत्यादी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजना या राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल द्वारे ऑनलाईन रित्या राबविल्या जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य शासनाची शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) योजना यांचा समावेश आहे. उपरोक्त दोन्ही योजनांतर्गत वर्षाला सरासरी सुमारे साडेचार ते पाच लाख अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत करून योजनेचा लाभ घेत आहेत.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थी अथवा त्याचे संबंधित महाविद्यालये अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर देखील अगदी शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत सदर योजनांकरिता विद्यार्थ्यांचा अर्ज नोंदणीकृत करत नाहीत व अंततः विद्यार्थी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती पासून वंचित राहतो. सदर बाब केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे मागील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून शिष्यवृत्ती करिता ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत करावयाची प्रक्रिया ही त्या-त्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेमधीलच एक भाग असुन महाविद्यालयांनी त्याच वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत करणे आवश्यक असल्याचे धोरण राज्य शासनाने निश्चित केलेले आहे.

तेव्हा आपणास विनंती करण्यात येत आहे की, आपल्या अधिनिस्त राज्यातील सर्व महाविद्यालयातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेऊ इच्छित असलेल्या राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्तींचा लाभ घ्यावयाचा असल्यास संबंधित शिष्यवृत्ती योजनेच्या निकषांनुसार राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल द्वारे अर्ज करावयाच्या सूचना आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निर्गमित कराव्यात. तसेच आपल्या व महाविद्यालयस्तरावरून प्रसिध्द होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिका (Broucher), ऑनलाइन अर्ज व सबंधित वेबसाईट/पोर्टल/मोबाईल ॲप या सर्व माध्यमातून विशेष सूचना निर्गमित कराव्यात. त्याचप्रमाणे शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता अर्ज करणे हा देखील प्रवेश प्रक्रियेचाच भाग असल्याच्या सूचना देखील निर्गमित कराव्यात जेणेकरून विद्यार्थी विहित वेळेत शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाईन नोंदणीकृत करून परिपूर्ण सादर करतील.

उपरोक्त बाबीसह महाडिबीटीची लिंक देखील आपल्या स्तरावरून उपलब्ध करून दिल्यास उपरोक्त प्रस्तावित केलेली शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीची प्रकिया विहित वेळेत पुर्ण करून विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती अदा करता येईल.

याबाबत खालील नमूद ठळक बाबींचा आपल्याद्वारे व महाविद्यालयाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रीयेपूर्वीच्या सर्व प्रसिद्ध होणाऱ्या माहितीपुस्तीके मध्ये समावेश करावा.

- प्रवेश निश्चित झालेल्या अनुसूचित जाती व विविध मागास प्रवर्गातील तसेच आर्थिक मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांनी राज्य शासना मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या/ फ्रिशिप इत्यादी योजनांकरीता राज्य शासनाच्या

https://mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर जाऊन योजनेच्या निकषा नुसार ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.

- ऑनलाईन शिष्यवृत्ती/फ्रिशिप करीता विद्यार्थ्यांनी प्रवेशप्रक्रियेव्दारे निर्धारित केलेल्या महाविद्यालया मध्ये विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेश घेतलेल्या तारखेपासून पुढील एक महिन्याच्या आत महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती/फ्रिशिप इत्यादी करीता परीपुर्ण अर्ज करणे आवश्यक आहे.

माहितीपुस्तीकेमध्ये प्रसिध्द करावयाच्या इंग्रजी भाषेतील वरील दोन सुचना -

- Applicants from Scheduled Castes, Various Backward Classes and Economically Backward Classes who have secured and confirmed their final admissions can avail the benefit under State Government various Scholarship/ Freeship schemes etc. by applying online through State Government https://mahadbt.maharashtra.gov.in/ portal.
- For availing the prescribed benefit of scholarship/Freeship schemes, etc. the candidate must fulfill the scheme eligibility and submit online application through MahaDBT portal within One month from the date of securing final admission in the college/ institution.

तसेच, राज्य शासनाच्या धोरणानुसार शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, विद्यावेतने व निर्वाह भत्ते इत्यादी विविध शैक्षणिक योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा असल्यास संबंधित विद्यार्थ्याने व महाविद्यालयाने त्या-त्या शैक्षणिक वर्षातच प्रवेश प्रक्रीयेचा भाग असलेले शिष्यवृत्ती करिता ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. तेंव्हा उपरोक्त बाब प्रवेश प्रक्रीयेचा भाग असेल हे सुनिश्चित करावे. जेणेकरून राज्यातील अनुसूचित जाती व तत्सम मागास प्रवर्गातील विद्यार्थी पुढील शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत.

आपला विशासू,

03-05-24

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त,
समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य पुणे.१

प्रत :- माहितीस्तव.

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांचे स्वीय सहाय्यक

३) कक्ष अधिकारी(शिक्षण-१), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई -३२

प्रत :- कार्यवाहीस्तव

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (सर्व)

आपल्या जिल्ह्याच्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना उपरोक्त बाबीची प्रसिद्धी करून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रीयेपूर्वी विद्यार्थी व पालकांपर्यंत वरील सूचना निर्गमित होतील याची खातरजमा करण्याच्या लेखी सूचना आपल्या स्तरावरून सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात याव्यात.